# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/जिमसनिव/निदेश/ /२०१५/३१९१
दिनांक : १६/३ /२०१५.

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

**विषय : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने निवडणूकीसाठी मतदार यादी अंतीम करणेबाबत.....**
**संदर्भ : आपले पत्र जा.क्र.प्रशासन/जिमसनिव/निर्देश/८४३/२०१५ दि.११/०३/१५ चे पत्र.**

वरील संदर्भिय आपल्या पत्रात नमुद केलेल्या बाबींबाबत चे सर्वसाधारण मार्गदर्शन पत्र स्पष्टीकरण सदर पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. निवडणूक नियमातील तरतुदी स्वयंस्पष्ट असुन आपणास प्राप्त अधिकारानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त यांचे मान्यतेने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

| अ.क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | सदर निरीक्षणाचे अवलोकन केले असता अशा संस्थेचे संचालक मंडळ बँकेच्या संचालक मंडळाचे निवडणूकीसाठी प्रतिनिधी पाठविण्यास पात्र नाहीत, परंतू अशा संस्थांनी त्यांचे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठराव घेऊण एखाद्या सभासदाची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केल्यास सदर प्रतिनिधीचा समावेश अंतिम मतदार यादीमध्ये करावा किंवा कसे याबाबत प्राधिकरणाचे स्पष्ट निर्देश असणे आवश्यक आहे. | महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणुक ) नियम, २०१४ चे नियम १० (३) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे : "While communicating the name of the representative to the society affiliated society shall enclose a copy of the resolution of the annual general body meeting of the society or its committee as provided under its by-laws, where the representative is so authorized."<br>उपरोक्त तरतुदीनुसार संस्थेच्या प्रतिनिधी बाबतचा ठराव संस्थेच्या अधिमंडळ सभेचा विधीग्राह्य असेल अथवा समितीचा ठराव विधीग्राह्य असेल ही बाब पुर्णतः संस्थेच्या उपविधीतील तरतुदीवर अवलंबुन आहे. |
| २ | मा. न्यायालयात मांडलेले मत विचारात घेता ज्या संस्था सभासदांना त्यांचे प्रतिनिधीचे ठराव दिनांक २०/०२/२०१५ पर्यंत सादर केलेले नाही अशा संस्था निवडणूक कार्यक्रमांमध्ये कोणत्या टप्प्या पर्यंत त्यांचे प्रतिनिधीचा ठराव देऊ शकतात याबाबतचे स्पष्ट निर्देश प्राधिकरणाकडून निर्गमित होणे आवश्यक आहे. | प्राधिकरणाचे पत्र जा.क्र. रा.स.नि.प्रा./ जिमस बँक/ ठरावा बाबत/ २७१८/ २०१५ द्वारे " जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणुक ) नियम, २०१४ चा नियम १० नुसार ठराव स्विकारण्याच्या निश्चित केलेल्या अंतिम तारखे पर्यंत ठराव दाखल न केलेल्या संस्थांचे ठराव उक्त नमुद निश्चित केलेल्या अंतिम तारखेनंतर प्राप्त झाल्यास तसे ठराव प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होई पर्यंतच्या तारखेपर्यंत नियम १०(३) अन्वये संबंधीत संस्थेने स्वीकृत करून त्याप्रमाणे प्रारूप यादीत समाविष्ठ करावे". असे कळविलेले आहे.<br>प्रस्तुत प्रकरणात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या बाबत प्रारूप मतदार यादी दिनांक ०२/०३/२०१५ रोजी प्रसिद्ध करावयाची होती. त्यानुसार संबंधीत बँकेने उक्त दिनांका पर्यंतचे ठराव स्वीकृत करून संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे दाखल करणे अभिप्रेत होते.<br>प्रारूप यादी प्रासिद्धी नंतर असे ठराव प्राप्त् झाल्यास अशा ठरावांबाबत महाराष्ट्र सहकारी संसथा (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ११ अन्वये पुढील कार्यवाही संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. |